# सेरेबल पाल्सीग्रस्त मुलांना साहित्य वाटप




साहित्य वाटपप्रसंगी रितू छाब्रिया, श्री.छ.सौ.दयमयंतीराजे भोसले, श्री.छ.उदयनराजे भोसले, अश्विन मुद्गल आदी.

सातारा, दि. ५ (प्रतिनिधी) : सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाऊंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे मिळविता येईल. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयरच्या वितरणप्रसंगी साताऱ्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. साताऱ्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी सौ. पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे सीईओ जाल कूपर, रुबी हॉल क्लिनीकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम हॉस्पिटलच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात एकूण पाच व्हिलचेअर्स, पाच कमोड व्हिलचेअर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेयर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत.